

नारायणा स्कूल, मुक्ताई नगर, लातूर येथील शाळेतील विद्यार्थी राजवीर लक्ष्मण बिराजदार या विद्यार्थ्याचा नुकताच वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी या विद्यार्थ्याने आपल्या वाढदिवसा दिवशी अनावश्यक खर्च टाळून त्याच्या आई-वडीलांनी शाळेला वाढदिवसाची आठवण म्हणून वृक्ष भेट दिली. खरोखरच हा उपक्रम चांगला असुन याचे अनुकरण सर्व पालकवृंदांनी करावे असे झाडे लावा, झाडे जगवा हा राष्ट्रीय संदेश देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.


साप्ताहिक

# खबर

से हकिकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK






● Email : shirishkumarsherkhane@gmail.com ▌संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२ ● WEBSITE : https://khabarsehakikattak.in

लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष २ रे. | अंक १२ वा. | सोमवार दि.२६ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ | RNI No. : MAHMAR/2023/86200 | किंमत २ रूपये | पाने : ४


## सप्टेंबरपासून डिजिटल जनगणना सुरू होणार?

नवी दिल्ली : एक तर देशात २०२1 पासून जनगणना रखडली आहे. दर १० वर्षांनी जनगणना केली जाते. मात्र, केंद्र सरकारने कोरोनाचे कारण पुढे करून जनगणना लांबणीवर टाकली. आता हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे सप्टेंबर २०२४ पासून जनगणना सुरू होऊ शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे. सरकारने मात्र याविषयीचे पत्ते उघड केलेले नाहीत. मात्र, एकीकडे जनगणना सुरू होणार असेल, तर त्यात जातनिहाय जनगणनेचाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्यामुळे यावरूनही वाद उद्धवण्याची शक्यता आहे.



दरम्यान, जनगणनेतील विलंब पाहता सरकारी योजना व धोरण वर्ष २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित बनत आहे. त्यामुळे आर्थिक आकडे, चलन दरवाढ, नोक-यांचा अंदाज इत्यादी सांख्यिकीय गुणवत्तेवरही त्याचा परिणाम होत आहे. १८८१ पासून दर १० वर्षांनंतर जनगणना केली जाते. त्यामुळे त्या नियमावलीनुसार २०२१ मध्ये जनगणना अपेक्षित होती. परंतु कोरोनामुळे सरकारने ते टाळले. जनगणना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान दोन वर्षे लागतील. म्हणूनच सप्टेंबरमध्ये जनगणना सुरू झाल्यास अंतिम आकडेवारी २०२६ च्या शेवटी किंवा २०२७ च्या सुरुवातीस मिळू शकेल. त्यामुळे जनगणनेचे चक्र फिरू शकते आणि २०३१ ऐवजी पुढील जनगणना २०३७ ला होऊ शकते. कारण जनगणनेचे काम पूर्ण झाल्यापासून ही तारीख गृहित धरली जाते.

आता जनगणनेचे नवीन चक्र २०२५ नंतर २०३५ व २०४५ मध्ये होईल. विशेष म्हणजे यावेळची जनगणना डिजिटल असेल. सेल्फ एन्युमरेशन ॲपची मदत घेतली जाणार आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये प्रशासकीय विभागातील (पान २ वर)

## सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी शाळांना एक महिन्याची मुदत; सुरक्षारक्षक, सफाई कामगार, बसचालकांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक

मुंबई : बदलापूरच्या दुर्दैवी घटनेनंतर शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शालेय शिक्षण विभागाने याची गंभीर दखल घेतली असून शाळेकडून नेमणूक होणाऱ्या सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत घेण्याचा तसेच एक महिन्याच्या आत शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या सूचनांचे पालन न करणाऱ्या शाळांवर कडक कारवाई करण्याचा इशाराही शिक्षण विभागाने दिला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यातील सर्व शाळांना देण्यात आले आहेत. सध्या शाळांमध्ये अस्तित्वात असलेल्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच काही नवीन उपाययोजना शिक्षण विभागाने शाळांना सुचविल्या आहेत.



शाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबत अनुचित प्रकार घडल्याचे उघड झाल्यानंतर संबंधित शाळेने सदर घटना २४ तासांच्या आत संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक आहे. घडलेली अनुचित घटना कोणत्याही प्रकारे दडवून ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधित शिक्षण संस्था किंवा व्यक्तीवर गंभीर कारवाई केली जाणार आहे. कंत्राटी पद्धतीने सुरक्षारक्षक, सफाईगार, मदतनीस, स्कूल बस चालकाची नेमणूक करताना त्यांची काटेकोर तपासणी शाळा व्यवस्थापनामार्फत होणे आवश्यक आहे. या नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत घेणे आवश्यक राहील.

**सर्व शाळांमध्ये तक्रार पेटी**

राज्यातील सर्व शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्यात यावी. तक्रार पेटी उघडण्याबाबत तसेच त्यात प्राप्त झालेल्या तक्रारीवर कार्यवाही करावी. तक्रार पेटी बसविणे व त्यासंदर्भात तरतुदींचे पालन करणे अनिवार्य

**बसचालकांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक**

आहे. यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकास व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल. यात कसूर झाल्याचे आढळून आल्यास मुख्याध्यापकावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**सखी सावित्री समिती**

शाळा, केंद्र, तालुका/शहर साधन केंद्र या स्तरांवर सखी सावित्री समिती नेमण्यात आली आहे. राज्यात प्रत्येक स्तरावर गठित करण्यात आलेल्या समित्यांनी त्यांना नेमून दिलेली कार्ये विहित कालावधीत पार पाडणे आवश्यक आहे.

**शाळा परिसरात सीसीटीव्ही**


सर्व शाळांनी एक महिना कालावधीत शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक राहील. या तरतुदीचे पालन न करणाऱ्या शाळेचे अनुदान रोखणे अथवा शाळेची मान्यता रद्द करणे अशा कारवाईचा बडगा उचलण्यात येणार आहे. ठराविक वेळेनंतर सीसीटीव्हीचे फुटेज तपासणेदेखील आवश्यक आहे. असे फुटेज तपासणे व काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असेल.

### लातूर मनपा कार्यालयाचा अजब कारभार..

## कार्यादेशाच्या तारखेचा व कामाचा नाही मेळ काम दिले एकीकडे तर ते केले भलतीकडेच!

**शिरीषकुमार शेरखाने...**

लातूर : शहर मनपा बांधकाम विभागाच्या कार्यादेशाअगोदर ९ दिवसांनी गुत्तेदाराने काम सुरु केले. मात्र तेही लेखी आदेशात दाखविलेल्या ठिकाणाशिवाय अगदी भलतीकडेच. आणि ते पण अतिक्रम हटविण्याच्या आदेशापूर्वीच १४ दिवसांनी. शिवाय चक्क चालू कोसळत्या पावसात पूर्व पक्के डांबरी रस्ते व पक्या सिमेंट गटारी, अक्षरशः मनमानी करत अगदी जब्बरदस्तने, जेसीबी यंत्राने परस्पर फोडून उध्वस्त केले. सदर मनमानी गैर प्रकाराच्या चौकशीसह यातील सर्व सहभागी विरुद्ध, तातडीने कायदेशीर कठोर कार्यवाही करावी, अन्यतः १७ सप्टेबर रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयावर बेमुदत उपोषण करणार असल्याचे, स्मरण विनंती निवेदन संबंधितांना सादर केले आहे.




लातूर शहर मनपा कार्यालयाच्या या अफलातून प्रशासकीय कार्यपध्दतीची अजब माहिती अशी की, विवेकानंद चौक ते सिध्देश्वर चौक हा सरकारी पक्का डांबरी रोड आहे. त्यास दोन्ही बाजूने सिमेंट गटारी आहेत. मात्र या रस्त्यामध्ये कृपासदन रोड लगत अलिकडे, दोन्ही बाजूच्यां ५-६ सुशिक्षित कर्मचारी कुटुंबियानी बेकायदा अतिक्रमण केले आहे. सदर गैर अतिक्रमण हे मा. लव्हेकर व मा.जी.श्रीकांत या दोन्ही जिल्हाधिका-यांनी त्यांच्या कार्यकाळात, स्वतः स्वतंत्रपणे २ वेळा काढले होते. पण मनपा कृपेने परत त्या परिवारांनी चक्क तिस-यांदा तेथे सत्तीने आपले पूर्ववत गैर अतिक्रमण केले. त्यामुळे सदर ठिकाणी सुमारे दोनशे फुट अंतरात, त्यांनी पक्का रोड वा दोन्ही बाजूनी पक्या गटारी कांही उद्याप होऊच दिल्या नाहीत. आणि त्रस्त नागरिकांनी अनेक तक्रारी करूनही, मनपाने रस्त्यामधील ते अतिक्रमण पुन्हा हटविलेच नाही. तरीही दि.१३/०७/२०२४ रोजी अचानकपणे एक गुत्तेदार त्यांच्या जेसीबीसह आले. आणि त्यांनी कोसळत्या पावसात त्या अतिक्रमणा अलिकडे, सुमारे दोनशे फुटांचा पक्का रोड ऊखरून नष्ट केला. आणि अलिकडील बाजूची अंदाजे १५ फुटांची नवी सिमेंट गटार, त्याच यंत्राने विनाकारण फोडून उखडून टाकली.

त्यामुळे मातोश्री रमाबाई सोसायटीतील काही नागरिकांनी हा मनमानी गैर विध्वंस पाहिला. आणि ते ताबडतोब थांबवत त्यांना म्हणाले की, त्या अतिक्रमणा ठिकाणी रोड- गटारी नाहीत. रस्ता अत्यंत अरुंद व चिखल पाण्यात गेला आहे. तुम्ही ते करा. असे मूळ चांगल्याचे वाटोळे करू नका. त्यावर गुत्तेदार म्हणाले आम्हास अधिका-यांनी तिकडे नव्हे तर इकडेच सांगीतलेय. तेथे आम्ही करणार नाही. आणि आम्हास तुम्ही अडथळा केला तर, उलट तुमच्यावरच पोलिस केस करूत. त्यांच्या सोबत कार्यादेश वा कोणी कर्मचारी पण नव्हते. तरीही याविषयी नागरिकांनी दि.१६/०७/२०२४ ला मा. जिल्हाधिकारी व मनपा मा. आयुक्तांना लेखी निवेदन दिले. हे चुकीचे काम थांबवून, ते गरजे प्रमाणे पुढे वरील भागात करावे अशी मागणी केली. अन्यतः १५ ऑगस्टला मा. जिल्हाकचेरीवर आम्ही अमरण उपोषण करू असा इशारा दिला. त्यानंतरही २८ दिवस लोटले. पण मनपाने कसलिही हालचाल केली नाही. तसेच या विषई मा. जिल्हाधिकारी यांनी २५ जुलैला दिलेल्या लेखी पत्राचीपण, मनपाप्रशासनाने कसलिही दखल घेतली नाही. तर उलट त्यांनी सदर गुत्तेदार व त्यांच्या कांही लोकांना लावून देऊन, तक्रारकर्त्या नागरिकावर सतत दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.आणि शेवटी दि.१३/०८/२०२४ रोजी त्यानी दुपारनंतर अर्जदारांना एक पत्र आणि सोबत दोन सहपत्र दिले. त्यात अश्चर्याची बाब अशी होती



की, मनपा प्रशासनाने सदर गुत्तेदारास दि.२२/७/२०२४ ला कामाचा करारनामा व लेखी आदेश दिलेला होता. आणि त्यामध्ये मातोश्री रमाबाई सोयटीतील प्रभू चिकाटे व केरबा शिरसाट यांच्या घरापर्यंत नाली बांधणे असे दर्शविले होते. आणि सोबत त्यांचे अन्य एक पत्र होते.

**अनागोंदीविरुध्द अमरण उपोषणाचे स्मरण**



त्यात त्यांनी दि.३१/०७/२०२४ रोजी त्यांच्या अतिक्रमण विभाग प्रमुखास पत्र दिलेले होते. त्यात असे खोटे नमुद केले आहे की, गुत्तेदार व मजूर तेथे गेले असत्ता त्या भागातील नागरिकांनी ते अतिक्रमण हटविण्यास विरोध केला आहे. तरी आपल्या विभागामार्फत जागेवरून अतिक्रमण काढून घ्यावे. तर त्या गुत्तेदाराने कार्यादेश मिळण्या अगोदर ९ दिवसांनी तर अतिक्रमण हटविण्याच्या आदेशापूर्वी १८ दिवस अगोदर प्रत्यक्ष काम सुरु केले होते. तसेच यातील खेदजनक बाब अशी की, सदर ग्रुत्तेदाराने आदेशापूर्वी मनाने दुसरीकडेच काम सुरु केले आहे. तेही पूर्व पक्के रोड व पक्या गटारी फोडण्याचे. त्याने कार्यादेशाप्रमाणेच ते अतिक्रमण काढण्याचीही वाट कांही पाहिली नाही.

एवढेच नव्हे तर १३/०७ ला अशा त्यांच्या लाडक्या अनागोंदी विषयी नागरिकांनी दि.१६/०७/२०२४ रोजी लेखी निवेदन दिले. त्यामुळे मनपाने पुढे २२/०७ ला गुत्तेदारास कार्यादेश काढला. आणि त्यानंतर पुढे त्यांनी ३१/७ ला येथील अतिक्रमणा बाबत पत्र दिले. म्हणजे गुत्तेदार व प्रशासनाने घातलेला हा गोंधळ कोणासही समजणे अति कठीणच होते. हा सर्वकांही महाघोळी केवळ दिखावा आहे. दीड महिना झाला. अजूनही अद्याप तेथे रितसर कार्यवाही झालेली नाही. म्हणून यांच्या या सराईत लपालपीच्या महाभंयकर खेळाचा, त्रस्त नागरिकांनी आपला तीव्र संताप व्यक्त करत, मनपा प्रशासनाचा जाहीर निषेध नोंदवला आहे. आणि यातील सर्व दोषीविरुद्ध कडक कार्यवाही करावी. तसेच विनाकारण फोडलेली पूर्व पक्की गटारी व रोड, त्वरीत दुरुस्त करून द्यावी. सदर रोडवरील पुढील अतिक्रमण हटवून, तेथे पक्या गटारी व रोड करावेत. सध्या पावसाचे दिवस असल्याने, या हितसंबंधी गैर तोडफोडीमुळे येथे घाणीचा व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्याकरिता येत्या १७ सप्टेबर रोजी अशा मनपाशाहीच्या बनवाबनविविरुद्ध, मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयावर सनदशीरपणे सामूहिक अमरण उपोषण करूत ! असा निर्वाणीचा इशारा या स्मरण निवेदनात देण्यात आला आहे.

## समाज व राष्ट्रसेवा प्रामाणिकपणे केल्याने आपले व्यक्तीमत्व व्यापक परिपूर्ण बनते-राज्य संचालक ॲड.चंद्रशेखर धोत्रे

**लातूर : समाज व राष्ट्रसेवा आपण अत्यंत प्रामाणिकपणे केली तर, आपले व्यक्तीमत्व अधिक व्यापक आणि परिपूर्ण बनते असे प्रतिपादन, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय अपराध जाँच ब्यूरोच्या महाराष्ट्र राज्य मुंबईचे संचालक ॲड. चंद्रशेखर धोत्रे यांनी केले. ते राज्य दौऱ्या निमित्ताने लातूर येथे आले असताना, एनसीआयबीचे पूर्व शहर गुन्हे माहिती अधिकारी श्री शिरीषकुमार शेरखाने, यांना जिल्हा संचालकपदी पदोन्नती जाहीर झाल्याने, ते त्यांच्या सत्कार प्रसंगी बोलत होते.**



यावेळी बोलताना एनसीआयबीच्या महाराष्ट्र राज्याचे संचालक ऍड. धोत्रे पुढे म्हणाली की, जन सेवा हाच आपला मुख्य स्थाई भाव आहे. आणि त्यासाठी दयाशीलता हे महत्वाचे तत्व आहे. संकट कालीन किंवा कठीण समई, तत्परतेने धावून मदत कार्याला लागणे यासाठी, विचार आणि मनाची एक पक्की जडण घडण असावी लागते.

शेरखाने यांचे कलाक्षेत्रासह आर एस पी ऑफिसर व एम सी सी ऑफिसर म्हणून केलेले पूर्व सेवा कार्य हे उल्लेखनीय होते. त्यानंतर पुढे त्यांनी गेली ४ वर्षे एनसीआयबी च्या शहर गुन्हे माहिती अधिकारीपदावरून दिलेली सेवा, ही पण विशेष उल्लेखनियच राहिली आहे. या शिवाय गेली वर्षभर त्यांनी सामाजिक पत्रकारितेच्या क्षेत्रातसुद्धा लक्षणीय असेच कार्य केले आहे. त्यांच्या या सर्व बाबींची एनसीआयबी या राष्ट्रीय सेवाभावी संस्थेने विशेष दखल घेतली. आणि राष्ट्रीय अपराध जाँच ब्यूरोच्या केंद्रीय कार्यालयाने,श्री शेरखाने यांची जिल्हा संचालकपदी निवड केली असल्याचे, स्वतः राज्य संचालक श्री धोत्रे यांनी यावेळी घोषित केले. या राज्यव्यापी आढावा दौ-या प्रसंगी राज्य संचालक ऍड. धोत्रे यांनी, ४ ऑगस्ट रोजी लातूर येथे जिल्हा संचालक श्री शेरखाने यांचा हृद्य सत्कार केला. या प्रसंगी नाशिकचे जिल्हा संचालक प्राचार्य मनिषा जोंधळे, प्राचार्य संगिता बागूल, जिल्हा गुन्हे माहिती अधिकारी ऍड. बसवेश्वर पसारे, जिल्हा गुन्हे अधिकारी,प्रिन्सीपल गुरूकुल स्कूलचे प्राचार्य सुरेशकुमार तायडू, निवृत्त पोलिस उपनिरिक्षक मोहन जाधव, जिल्हा गुन्हे माहिती अधिकारी प्राचार्य सुधीर चेरेकर, जिल्हा माहिती गुन्हे अधिकारी रुद्रा टाचले, वसतिगृह अधीक्षक दत्तप्रसाद (राजू) कुलकर्णी आदी उपस्थित होते. श्री शेरखाने यांच्या या सामाजिक यशाबद्दल निवृत्त सनदी अधिकारी वसंतराव वाघमारे, माजी सरपंच श्री माधवराव गायकवाड, ज्येठ सामाजिक कार्यकर्ते वलभाई शेख, ऍड. रघुनाथ बेडदे जानवळकर, संजय व्यवहारे, शाम वरियाणी, रोहिणी कांबळे, रामकुमार रायवाडीकर, गणपतराव तेलंगे, आत्माराम गिरी, अगंदराव कांबळे, बाबुराव झाकडे, दिगंबर सुर्यवंशी, रामदास ससाणे, प्रा. डी. टी. घटकार, प्रा. रामकिशन समुखराव, अमिनसाब शेख, बाळ होळीकर, भाऊसाहेब कांबळे, अनिरुद्ध वाघमारे, नितिन गायकवाड, पांडूरंग देडे, पंडितराव भंडे, आदींनी अभिनंदन केले आहे.




## संपादकीय....

# बदलापूरकरांचे आंदोलन!

बदलापूर रेल्वे स्थानकावर आंदोलकांनी दिवसभर ठिय्या मारून कल्याण-कर्जत रेल्वे सेवा बंद पाडली. रेल्वे सेवा ठप्प झाल्याने मुंबईकडे येणाऱ्या हजारो चाकरमान्यांना मोठा फटका बसला. दोन बालिकांचे शाळेत झालेले लैंगिक शोषण ही अंगावर काटा आणणारी घटना आहे. नराधमाला पोलिसांनी अटक केली असली तरी त्याला फाशीच दिली पाहिजे, या मागणीसाठी हजारो स्त्री-पुरुष रस्त्यावर व रेल्वे मार्गावर उतरले होते. केवळ बदलापूरलाच नव्हे तर पुरोगामी महाराष्ट्रालाच काळिमा फासणारी ही घटना आहे. कोलकत्याच्या सरकारी इस्पितळात एका ट्रेनी डॉक्टरवर गँगरेप होतो व तिची निर्घृण हत्या केली जाते, या घटनेने देश हादरला. कोलकत्याच्या त्या सामूहिक बलात्कार व हत्येवर देशभर संताप प्रकट होत असताना महाराष्ट्रात मुंबईजवळ बदलापूरमध्ये दोन चिमुरड्या मुलींवर बलात्कार झाल्याची घटना घडावी, हे लांच्छनास्पद आहे.

महाराष्ट्रात सध्या लाडकी बहीण योजना जोरदार राबवली जात आहे. रक्षाबंधनापूर्वीच लक्षावधी बहिणींच्या बँक खात्यात सरकारने देऊ केलेले दोन महिन्यांचे तीन हजार रुपये जमाही झाले. त्याचाही गाजावाजा मोठा झाला. पण बदलापूरच्या घटनेनंतर शेकडो महिला रस्त्यावर उतरल्या व आम्हाला फुकटचे पैसे नकोत तर आम्हाला आमच्या लेकरांची सुरक्षा महत्त्वाची आहे म्हणून टाहो फोडताना दिसल्या. ज्या शाळेत दोन बालिकांवर लैंगिक अत्याचार झाले, ती शाळा व शिक्षण संस्थाही नामांकित आहे. अशा शाळेत लैंगिक शोषणाची घटना घडली, हे धक्कादायक आहे. शाळेच्या व्यवस्थापनात काही त्रुटी होत्या की शाळा राम भरोसे चालू होती? शाळेचे चालक व व्यवस्थापन एका विशिष्ट विचाराचे आहेत, अशीही चर्चा सुरू झाली. पण शाळेत येणारे लोक किंवा नेमलेले कर्मचारी कोणत्या विचाराचे असतात, कोणत्या संस्कारातून पुढे आलेले असतात, हे कुणालाच ठाऊक नसते. आई-बाप आपल्या मुलांना व मुलींना शाळेत पाठवतात, ते शाळेवर विश्वास ठेऊनच. शाळेत चांगले संस्कार होतील, चांगले शिक्षण मिळेल, चांगल्या वातावरणात आपली मुले मोठी होतील या हेतूने पालक मुलांना शाळेत पाठवत असतात. पण शाळेत अंदाधुंदी चालू असेल, तर चिमुरड्या मुलींचे लैंगिक शोषण होणार असेल, तर पालकांनी काय करायचे? बदलापूरमधील या शाळेच्या विश्वासाला तडा गेला आहे. शाळेच्या प्रतिमेला डाग लागला आहे. बदलापूरमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे.

बदलापूरमधील घटनेनंतर पोलिसांनी तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यावर गेलेल्या पालकांना तासनतास बसवून ठेवले असेल तर तो अक्षम्य गुन्हा म्हटला पाहिजे. घटना घडल्यावर तब्बल बारा तासांनी एफआयआर नोंदवला गेला असेल तर तो पोलिसांचा अक्षम्य हलगर्जिपणा आहे. चौकशीत त्या शाळेत सीसीटीव्ही नव्हते, असे आढळले आहे, तो तर व्यवस्थापनाचा दोष आहे. बदलापूरमध्ये अतिशय संवेदनशील धक्कादायक घटना घडली याची कल्पना पोलीस, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि राज्यकर्ते यापैकी कुणालाच नव्हती याचे मोठे आश्चर्य वाटते. नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी आणि श्रावणातील मंगळागौरीच्या दिवशी दोन मुलींवर झालेल्या अत्याचाराबद्दल न्याय मागण्यासाठी हजारो लोक रस्त्यावर व रेल्वे मार्गावर येऊन आंदोलन करतात, हे पोलीस, प्रशासन व राज्यकर्त्यांना भूषणास्पद नाही. रेल्वे पोलीस आयुक्त, उल्हानगर येथील महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी किंवा राज्याचे एक मंत्रिमहोदय बदलापूरला जाऊन आंदोलकाना शांत करण्याचा प्रयत्न करतात व आंदोलन मागे घेण्याचे आवाहन करतात. पण त्याला आंदोलक प्रतिसाद देत नाहीत, हेच चित्र वृत्तवाहिन्यांच्या पडद्यावरून संपूर्ण महाराष्ट्राने बघितले. लोकांचा पोलीस-प्रशासनावर विश्वास राहिला नाही का, असा प्रश्न त्यातून निर्माण होतो. मुंबई व पुणे येथील हिट अॅण्ड रन प्रकरणात पुढे काय झाले हो, हे लोकांना चांगले कळते. बदलापूर घटनेत फास्ट ट्रक कोर्टात खटला चालवू, आरोपीला कठोर शासन करू असे जरी सरकारच्या वतीने सांगण्यात येत असले तरी त्यावर कितपत विश्वास ठेवायचा, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडतो.म्हणूनच सरकारच्या वतीने एक मंत्रिमहोदय बदलापूर रेल्वे स्थानकावर जाऊन ठिय्या मारलेल्या लोकांना आंदोलन मागे घ्या असे आवाहन करू लागले. तेव्हा जमावातून फाशी-फाशी अशाच वारंवार घोषणा दिल्या जात होत्या. काही संतप्त महिलांची तर त्या नराधमाला आमच्यासमोर फाशी द्या, अशी मागणी करण्यापर्यंत मजल गेली होती. दोषींना सोडणार नाही, असे सांगण्याची एक पद्धत झाली आहे, विरोधकांनी टीका केली की त्यांनी राजकारण करू नये, असे बजावले जाते. पण बदलापूरमध्ये जो प्रक्षोभ आणि आक्रोश प्रकट झाला, त्यामध्ये कुठेही, कोणत्याही राजकीय पक्षांचे फलक नव्हते किंवा झेंडे नव्हते. आंदोलकांनी शाळेत घुसून मोडतोड केली. आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या पण आंदोलक हटायला तयार नव्हते. हा कुठला प्रकार महाराष्ट्रात चालू आहे हे कळायला मार्ग नाही तरी सुजान नागरीकांनी अशा जमावात जाणे म्हणजे जोखीम स्विकारणेच आहे...!

## बिर्ला ओपन माईड इंटरनॅशनल स्कूलमधील दुसऱ्या राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप २०२४ मध्ये विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



लातूर : बिर्ला ओपन माईड इंटरनॅशनल स्कूलमधील दुसऱ्या राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप २०२४ मध्ये विद्यार्थ्यांचे घवघवीत यश युनिव्हर्सल मार्शल आर्ट कराटे आणि जीके इंटरनॅशनल कराटे अकॅडमी तर्फे राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत शाळेतील हर्षवर्धन गोविंद मदने ,अर्णव घुगे, देवार्थ घुगे आणि प्रत्युष कुलकर्णी या विद्यार्थ्यांचा सहभाग होता या विद्यार्थ्यांना सुवर्ण, रजत आणि कास्यपदके देऊन गौरविण्यात आले. या कराटे स्पर्धेमध्ये मुलांना पारितोषिक मिळवल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष संभाजी सुळ सर, सीए दिगंबर साके सर, सीए संभाजी सरडे सर, अॅड. सचिन सुळ सर, बिर्ला ओपन माईड्स इंटर इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य अनिल पोल सर, उपप्राचार्य अजय शर्मा सर, तसेच कराटे सेन्साई.प्रसाद माळी सर ब्लॅक बेल्ट 2nd डॅन यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र स्तुती करण्यात येत आहे.

## व्हॉईस ऑफ मीडिया लातूरच्यावतीने राष्ट्रध्वजाचे मोफत वाटप



लातूर : व्हॉइस ऑफ मीडिया लातूरच्या वतीने राष्ट्रध्वजाचे पदाधिकारी यांना वाटप यावेळी उपस्थित लातूर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष संगमजी कोटलवार, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष विष्णूजी अष्टेकर, उपाध्यक्ष सोनवणे संतोष, राघवेंद्र देबडवार, राजकुमार दाभाडे, योगेश साखरे, शिरीष कुमारजी शेरखाने, मनमत आप्पा बिडवे व इतर पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा अभियान अंतर्गत लातूर एज्युकेशन सोसायटी ,लातूर द्वारा संचलित ज्ञानेश्वर विद्यालय व जवाहर प्राथमिक शाळा यांच्या वतीने ध्वजारोहण कार्यक्रम करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर विद्यालय लातूर चे मुख्याध्यापक श्री.मलवाडे सर यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले सोबत उपमुअ श्री क्षिरसागर सर, पर्यवेक्षक द्वय श्री.बैनगिरे सर, श्रीमती.पाटील मॅडम ,जवाहर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.गोविंदवाड सर, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक – शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# एक संवेदनशील अस्वस्थता : चिंतन एका कार्यकत्र्यांचे

प्रा.निशिकांत देशपांडे
लातूर – मो.८३८१०५७६३१.

साथी सुनिल खंडाळीकर यांचे चिंतन कार्यकत्र्याचे' हे त्यांनी मांडलेल्या विविध विषयावर सखोल चिंतन करावे असे पुस्तक आहे. महाराष्ट्रातील बदलते राजकारण दुष्काळ, भूकंपाच्या नंतर निर्माण झालेले प्रश्न, राहूल गांधी यांचे भात जोडो' जनआंदोलन, त्याचा भारतीय राजकारणावर झालेला परिणाम, स्वयंसेवी चळवळीत काम करतांना त्यांना जाणवलेले प्रश्न, सेक्स आणि ल व्ह जिहाद, दुष्काळ अशा अनेक राजकीय व सामाजिक प्रश्नांवर त्यांनी, आपल्या लेखात चिंतन मांडले आहे. त्या-त्या प्रश्नाला भिडून त्याचा सखोल विचार करुन, त्याचे गार शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ते एक कार्यकर्ते असल्याने, त्यांच्या लेखाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनास एक वजन प्राप्त झाले आहे.

सुनिल खंडाळीकर यांचा समविचारी म्हणून आणि चळवळीतला कार्यकर्ता म्हणून, माझा तीस-चाळीस वर्षांपासून संबंध आणि मैत्री आहे. अहमदपूरला असतांना विविध विषयांवर चर्चा करणे, राजकीय सामाजिक प्रश्नांवर चर्चा करुन, देशाच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त करणे. समाजाचे भले कसे होईल ? यासाठी समाजकारण, राजकारणाने कोणते वळण घेतले पाहिजे ? यांच्यावर त्याचे सतत चिंतन चाले. त्यातून आकाराला आलेले हे, अभ्यासपूर्ण लेख आहेत. ज्या-ज्या वेळी समाजात जे-जे प्रश्न निर्माण झाले. समाजकारण ढवळून निघाले. त्याचे पडसाद त्यांच्या मनावर उमटलेले आहे. संवेदनशील मन असल्याने, ते या प्रश्नांनी अस्वस्थ झालेले आहेत. पण केवळ भावनात्मक दृष्टी अस्वस्थ न होता, त्यांनी या प्रश्नांचा बारकाईने विचार केला आहे. आणि त्यामून या लेखांचा जन्म झालेला आहे. केवळ वाचन, चिंतन आणि विचारच नाही तर आयुष्यभर, त्यांनी स्वयंसेवी संघटनेमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे. अनेक ठिकाणी हिंडून प्रत्यक्ष त्यांचा अभ्यास करुन, तेथील लोकांशी त्या प्रश्नांवर चर्चा करुन, त्यांनी निष्कर्ष काढले आहेत. त्यामुळे या लेखांना केवळ शाब्दिक मोल न येता, ते अनुभवाचे बोल झाले आहेत. समाजातील सामान्य माणसाचे प्रश्न घेऊन, त्यांनी विविध चळवळी केलेल्या आहेत. त्या संघर्षामध्ये त्यांनी, प्रत्यक्ष भाग घेतला आहे. अशी काम करतांना अंगावर येणाया, अनेक संघटना त्यांनी तोंड दिले आहे. त्यातून तावून सुलाखून निघून, त्यांचा सच्चा कार्यकत्र्यांचा पिंड घडला आहे. आयुष्यभर त्यांनी हे जे काम केले, भोगले त्याच्यवर चिंतन, मनन केले. त्याला शब्दबध्द केल्याने आपण केलेले हे काम, पुस्तक रुपाने पुढे आणले तर, आपल्या सारख्या कार्यकत्र्यांचे लढणे, झगडणे समाजासमोर मांडता येईल. असे वाटल्यावरुन त्यांच्या या लेखांचा जन्म झाला आहे. त्यांनी हे लिहिले नसते तर एक विचारांचा, अनुभवांचा खजिनाच लुप्त झाला असता, असे मला त्यांचे लेख वाचतांना वाटले. म्हणून त्यांच्या लेखावर आपण ही दोन शब्द व्यक्त केले पाहिजेत व त्यांची वैचारिक साथ दिली पाहिजे. या भावनेतून हे लिहीले आहे. सुनिल यांचे सजग मन राजकारणातील घडामोडीवर फार बारकाईने लक्ष ठेवते असे जाणवते. गेल्या दहा वर्षात भारतीय राजकारणाने एक मोठे वळण घेतले आहे. धर्मनिरपेक्ष राजकारणाकडून ते हिंदूत्वाकडे वळले आहे. अनेक वर्ष भारतावर राज्य करण्याचे आणि त्या निमित्तने, आपल्या पध्दतीने हिंदूत्ववादी राजकारण, देशात आणण्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ भाजपचे स्वप्न होते. ते मधले काही वर्ष अटलबिहारींचे राज्य असले तरी ते मध्यम मार्गी असल्याने, सगळ्यांना घेऊन चालण्याच्या आणि लोकशाही पध्दतीने राजकारण करण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे, पुरोगामी विचाराचे लोक त्यांच्या काळात इतके अस्वस्थ नव्हते. पण २०१४ साली मोदी पंतप्रधान




झाले आणि कडवे हिंदूत्ववादी राजकारण देशात सुरु झाले. लोकांना भावानात्मकदृष्टएा शब्दात अडकवून राजकारण पुढे न्यायचे, हे त्यांचे धोरण यशस्वी झाले. त्यात मोदी-शहांच्या हुकूमशाही वृत्तीमुळे त्यांनी, आपल्या हातातील इडी, सीबीआय सरख्या संघटनाचाही, विरोधकांना संपवून टाकण्यासाठी उपयोग केला. त्यामुळे एक दहशतीचे वातावरण देशात निर्माण झाले. अल्पसंख्याकांच्या मनात भय निर्माण झाले. त्यात एक पक्षीय हुकूमशाही देशात आणावयाची, या भावनेतून शत प्रतिशत भाजप' अशा घोषणा सुरु झाल्या. त्यादृष्टीने पाऊले पडू लागली. इस बार चारसौ पार' च्या घोषणेने तर भारताची समाजवादी, धर्मनिरपेक्ष घटनाच बदलून टाकायची असे राजकारण सुरु झाले. लोकांचे जीवन-मरणाचे प्रश्न, शेतीमालाचे भाव, आरोग्याचे प्रश्न, रस्ते ई. प्रश्न बाजूला पडून केवळ धार्मिक प्रश्न उभे करुन, लोकांना भावनात्मकदृष्टएा संमोहित करुन सत्ता मिळवायाची. असा डाव टाकला गेला. पण तो २०२४ च्या निवडणूकीतील यशस्वी झाला नाही. २०१९ च्या निवडणूकीतील यशामुळे एक प्रकारचा हम करे सो कायदा' असा अहंकार मोदी-शहा यांच्यामध्ये आला. पण राहूल गांधी यांची भारत जोडो'' न्याय यात्रा, लोकांच्यामध्ये जावून, त्याचे प्रश्न समजावून घेण्याची वृत्ती, त्यामुळे अहंकारी राजाकरणाला आपण प्रेमाच्या राजकारणाने शह देऊ शकतो, हे भारताच्या शहाण्या जनतेच्या लक्षात आले. आणि त्यांनी चार सौ पार'' ला दोनशे चाळीस पर्यंत खाली म्हणून अहंकाराचा भोपळा फोडला. त्यात महाराष्ट्राच्या एकूण फोडाफोडीच्या राजकारणास जनता विटली होती. त्यात कांद्याच्या भावाचा प्रश्न, निर्यात बंदी, सोयाबीनचे कोसळलेले भाव एकूणच मूळ प्रश्नाकडे, लक्ष न देणारे राजकारणी केवळ सत्तेसाठी साठमारी, आरक्षणाच्या नावाखाली मराठा व ओबीसी या दोन समाजात लावलेले भांडण, त्यामून समाजात निर्माण झालेली असुरक्षितता, त्याच्याबद्दल जनतेने अत्यंत हुशारीने, शांतपणे मतदानातून निर्णय घेतला आणि भल्याभल्यांच्या राजकारणाचे इमले धडाधडा कोसळले. केंद्र सरकार व राज्य सरकार दोघांनाही जनतेने कसे ताळ्यावर आणले, ते महाराष्ट्रातील सत्तांतर आणि हिंदूत्वांचे राजकारण, कुठे नेऊन ठवेला आमचा महाराष्ट्र ?', २०२४ निवडणुकीत प्रस्थापितांचा पराभव करुन, विस्थापिताचा विजय इ. लेखातून सुनिल खंडाळीकर यांनी अभ्यासपूर्ण रितीने मांडले आहे. त्यातून त्यांचा राजकारणाचा अभ्यास व चिंतन लक्षात येते. या पुस्तकातील विचारांचे तसे तीन भाग पडतात. एक राजकीय प्रश्नांचा विचार, दुसरा सामाजिक प्रश्नांचा विचार आणि तिसरा एका कार्यकत्र्यांने केलेल्या कामाचे विश्लेषण. त्यांच्या राजकीय विचाराच्या प्रश्नाचे आणि त्यातून त्यांनी मांडलेल्या निष्कर्षाचे चिंतन, वरील विवेचनात मांडले आहे. तर सामाजिक प्रश्नावरील लेखात दुष्काळ, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न. शेतीच्या सिंचनाचा प्रश्न, अतिक्रमीत गायरानाचा प्रश्न, भूकंपामुळे निर्माण झालेले प्रश्न, पुर्नवसनात झालेले घोटाळे, विशेष म्हणजे या जीवन मरणाच्या प्रश्नातही, राजकारण आणून निर्माण केलेला धर्मांतराचा प्रश्न, भूकंपग्रस्त भागात ज्या स्वंयसेवी संघटना काम करीत होत्या. त्यात विविध विचारांच्या, धर्माच्या स्वयंसेवी संघटना होत्या. भूकंपग्रस्तांच्या पुर्नवसनाचे काम, प्रत्येकाने आपल्या सामर्थ्याप्रमाणे केले. पण त्यात ही ख्रिश्चन लोकांनी तिथल्या निराधार विद्याथ्र्यांना, शिकवण्याचे निमित्त करुन त्यांचे धर्मांतर केले. अशी हिंदुत्ववाद्यांनी उठलेली आवई, त्यावरुन विनाकारणच पुनर्वसनाच्या बिगर राजकीय विषयात आणलेले राजकारण आणि धर्मकारण. यातून उठलेले वादळ, यातून मूळ प्रश्न बाजुला पडून झालेले राजकारण, धर्मकारण किती क्लेशदायी होते ? याचे विवेचन सुनील खंडाळीकर यांनी केले आहे.




कार्यकत्याला आपल्या कामातून मिळालेल्या अनुभवाने व त्यात निर्माण झालेल्या प्रश्नांचे विवेचन, आपल्याला आलेल्या प्रत्यक्ष अनुभवातून खंडाळीकर यांनी मांडले आहे. त्यात अतिक्रमित गायरानाचा प्रश्न, बालमजुरी निर्मूलन, स्वयंसेवी चळवळ एक अवलोकन, नर्मदा प्रकल्पाच्या कामातून निर्माण केलेले राजकारण. सेक्स आणि लव्ह जिहाद मुळे, निर्माण झालेले प्रश्न आणि त्यातील खरे-खोटेपणा याचा पदामर्श त्यांनी घेतला आहे. बालमजुरी भूकंपग्रस्त पुनवर्सन अतिक्रमित गायरानचा प्रश्नावर तर, त्यांनी प्रत्यक्ष काम केलेले असल्याने, त्यांनी उपस्थित केले प्रश्न, त्यावरच्या अनुभवाला प्रत्यक्ष कार्याचे मोल आहे. या प्रश्नांचा त्यांनी किती बारकाईने विचार केला आहे, ते हे लेख वाचताना जाणवते. विस्तार भयामुळे प्रत्येक लेखाचे सविस्तर विश्लेषण करणे शक्य नाही. पण त्यातून सुनिल खंडाळीकर यांची विचारसरणी, त्यांचे धर्मनिरपेक्षतेचे विचार, त्यांनी केलेले कार्य आणि त्यावर केलेला अभ्यास व चिंतन प्रकार्षाने जाणवते. साहित्यातल्या लेखापेक्षा हे अनुभवाचे बोल फार महत्त्वाचे आहेत. केवळ शब्दांचा फुलोरा न फुलवता लेखाची मांडणी, विश्लेषण, त्या प्रश्नांचे अभ्यासपूर्ण विवेचन, त्यावर सुचवलेले उपाय त्यामुळे या लेखाला पुस्तकांच्या शिर्षकाप्रमाणे, एका कार्यकत्र्यांच्या चिंतनाचे अभ्यासपूर्ण रुप प्राप्त झाले आहे. लेखाला साजेशी परखड भाषाशैली त्यांनी वापरली असली तरी, हे लिखाण कुठेही कंटाळवाणे होत नाही. एकूणच हे एका कार्यकत्र्यांचे चिंतन' आहे. याचे महत्त्व जाणून घेऊन या लेखाचे वाचन केले, तर पुस्तकाला न्याय दिल्यासारखे होईल. सामाजिक, राजकीय आणि स्वयंसेवी संघटनेतील कार्यकत्र्यांनी तर हे पुस्क आवर्जून वाचले पाहिजेच. पण सामाजिक, राजकीय प्रश्नांचा विचार करणाया त्या विषयी सजग जाणिवा असणाया वाचकांकडे नाही. हे पुस्तक वाचले पाहिजे इतके महत्त्वपूर्ण चिंतन, मनन आणि विवेचन या पुस्तकात आहे.

## सप्टेंबरपासून डिजिटल जनगणना सुरू ...

(पान १ वरून) सीमा निश्चित केल्याच्या ३ महिन्यांत जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात हाऊस लिस्टिंगचे काम सुरू होईल, असे सांगण्यात येते. एससी-एसटी आयोग अध्यक्ष,भाजप प्रवक्ता विजय सोनकर शास्त्री म्हणाले, जनगणनेत सर्व जातींची गणती करा. काही जाती विशिष्ट राज्यांत एससी-एसटी वर्गात येतात. म्हणूनच त्यांची गणना झाल्यास त्यात स्पष्टता होईल. विलंबाने होणा-या जनगणनेत ओबीसींचीही जनगणना व्हावी, असे काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार १२७० एससी, ७४८ एसटी जाती आहेत. २०११ मध्ये एससी लोकसंख्या १६.६ टक्के तर एसटी ८.६ टक्के होती. एकूण लोकसंख्येच्या ती २५.२ टक्के आहे.

**जातनिहाय जनगणनेला भाजपचा विरोधच**

जातनिहाय जनगणनेबाबत भाजप अनुकूल नाही. बिहारची प्रदेश शाखा मात्र त्याचे समर्थन करते. परंतु भाजपचे केंद्रीय नेतृत्व त्यावरून काँग्रेससह विरोधी पक्षावर जोरदार हल्ले चढवत आहे. भाजपने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर काँग्रेसची जातनिहाय जनगणनेची मागणी म्हणजे देशात फुटीचा डाव असल्याचा आरोप केला आहे.

**सामाजिक, आर्थिक आकडे गुलदस्त्यातच**

सामाजिक-आर्थिक आकडे कधी समोर आलेच नाहीत. मनमोहनसिंग सरकारच्या काळात २०११ मध्ये सामाजिक-आर्थिक, जातनिहाय जनगणना करण्यात आली होती. ग्रामीण विकास मंत्रालय, शहरी विकास मंत्रालय व गृह मंत्रालयाने ही प्रक्रिया राबवली होती. या पाहणीची आकडेवारी कधीही जाहीर केली गेली नाही. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावर त्याचे एससी-एसटी हाऊसहोल्ड आकडे जाहीर झाले.

## लातूर शहर संगांनिअयोचे नवे नायब तहसीलदार सतीष कांबळे



लातूर : लातूर शहर संजय गांधी निराधार अनुदान योजना विभागाला संतीष सा.कांबळे यांच्या रुपाने अनेक दिवसानंतर नायत तहसीलदार मिळाले आहेत.त्यांनी आपल्या पदाचा पदभार दि.१ ऑगस्ट २०२४ रोजी स्विकारला असून,त्यांच्या नियुक्तीचे स्वागत होत आहे.

साधारणतः २० वर्षांपूर्वी लातूर तहसील मध्ये लिपिद पदावर महसूल खात्यात दाखल झालेले सतीष कांबळे यांनी नंतर लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विविध विभागात कार्यरत होते. पुढे अव्वल कारकून म्हणून ते सेवा करत होते. नुकतीच त्यांना नायब तहसीलदार पदावर बढती मिळाली असून,त्यांना लातूर शहर संजय गांधी निराधार अनुदान योजनाचे नायब तहसीलदार म्हणून जनतेची सेवा करण्याचा मान मिळाला आहे.निराधारांना वेळेवर अनुदान देणे,पात्र गरजूंचे अर्ज लवकर निकाली काढून,शासनाची योजना इुलद्रुप करण्याचा आपला प्रयत्न राहील असे त्यांनी सांगितले.

# अखिल कक्काय्या-ढोर समाज विकास मंच १२ वा वर्धापन दिन मान्यवरांच्या उपस्थित साजरा



लातूर : अखिल कक्काय्या-ढोर समाज विकास मंच १२ वा वर्धापन दिन मान्यवरांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. दिनानिमित्त गेल्या बारा वर्षापासून संस्थेने केलेल्या विकास कामांची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार सोनवणे साहेब यांनी दिली. या वेळी भाजपा शहर सरचिटणीस दिनेश कावळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नारायण कोकणे यांचा गौरव केला.

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त अखिल कक्काय्या - ढोर विकास मंचचे अध्यक्ष राजकुमार सोनवणे व सर्व सहकारी यांची उपस्थिती होती. दिनेश कावळे यांना भारतीय जनता पार्टी अनु.जा.शहर सरचिटणीसपदी नियुक्तीबद्दल त्यांच्याही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी राजकुमार सोनवणे, धोंडीबा जाधव, इंजि. शंकर शिंदे, रंजना शिंदे, शोभा पोळ,संतोष कावळे, इंजि.मारोती बोधणे, नागनाथ त्रिंबके, नारायण कोकणे,मारोती पाटेकर, दिलीप इंगळे, डॉ.गोविंद नारवणे, नरेंद्र कावळे ,अनिकेत इंगोले, नितीन पोळ,अर्जुन कावळे, उपस्थित होते. सुत्र संचालन बोधने तर आभार प्रदर्शन धोंडिबा जाधव यांनी केले.

# द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस असोसिएशन इंडियाकडून माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांना साखर उद्योग गौरव पुरस्कार जाहीर

## पुण्यात २४ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या हस्ते होणार पुरस्काराने गौरव

लातूर : राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, जागृती शुगरचे संस्थापक अध्यक्ष, रेणा साखर कारखान्याचे संस्थापक दिलीपरावजी देशमुख साहेब यांना द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस असोसिएशन इंडिया पुणे यांच्यामार्फत दिला जाणारा सन २०२४ वर्षातील प्रतिष्ठित मानाचा साखर उद्योग गौरव पुरस्कार जाहीर झाला असून डीएसटीए इंडियाचे गळीत हंगाम २०२३ -२४ साठी चे मानाचे राज्यस्तरीय पारितोषके जाहीर झाली आहेत.

यामध्ये साखर उद्योग गौरव पुरस्कार पारितोषिक मांजरा साखर परिवाराचे मार्गदर्शक आदरणीय सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांना जाहीर करण्यात आला आहे या पुरस्काराचे वितरण २४ ऑगस्ट रोजी पुणे येथे राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,माजी सहकार मंत्री तथा भारतीय साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण शानदार सोहळ्यात करण्यात येणार आहे.

**शानदार सोहळ्यात पुरस्कार प्रदान होणार**

डी.एस.टी.ए ही सन



१९३६ मध्ये स्थापन झालेली साखर उद्योगातील एक नामांकित संस्था असून ,सदर संस्थेचे २२०० हून अधिक सदस्य आहेत .साखर उद्योगात या संस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका असून ,साखर उद्योगात केलेल्या अतुलनीय योगदानासाठी डीएसटीएम मार्फत साखर उद्योग गौरव पुरस्कार हे मानाचे पारितोषक दिले जाते. सदरील पारितोषक शनिवार दिनांक २४ ऑगस्ट २०२४ रोजी पुणे येथील सभागृह जे.डब्ल्यू.मॅरिएट सेनापती बापट रोड येथे डी.एस.टी.ए.च्या कार्यक्रमात उद्घाटनसत्र दरम्यान राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व साखर महासंघाचे अध्यक्ष माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील व अन्य मान्यवरांच्या हस्ते सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांना शानदार सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**दिलीपराव देशमुख यांच्या साखर उद्योग गौरव पुरस्काराने लातूरच्या शिरपेचात मानाचा तुरा**

राज्याचे माजी मंत्री आदरणीय दिलीपराव देशमुख साहेबांच्या कार्याचा गौरव आजपर्यंत राज्य व (पान ४ वर)

# विश्वाची प्रगती केवळ विज्ञानामुळेच संचालक प्रा.जी.एम.धाराशीवे

लातूर : आज विश्वाची जी प्रगती झाली ती केवळ विज्ञानामुळेच झाली असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूरचे संचालक प्रा. जी. एम. धाराशीवे यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि जिल्हा परिषद, लातूरच्यावतीने जिल्हास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२४ च्या उदघाटण समारंभात अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते.

यावेळी मंचावर उपशिक्षणाधिकारी संजय शिरसागर, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक लक्ष्मण बालवाड, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, परीक्षक प्रा. एन. ए. गोरे, प्रा. वनिता पाटील, प्रा. आव्हाड यांचे प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. पुढे बोलताना प्रा. गुरुलिंग धाराशिवे म्हणाले की, आजचे हे विद्यार्थी भविष्यातील संशोधक होतील.

मानवी जीवन विज्ञानाच्या सहाय्याने अतिशय सुखद आणि आनंदी बनलेले आहे. आज विज्ञाना शिवाय जगणे अत्यंत कठीण आहे. विज्ञानाच्या सहाय्याने भारत देश विकासाची उंच शिखरे गाठत आहे. या देशाच्या विकासासाठी आजचे विद्यार्थी उद्या योगदान देतील अशी अपेक्षा ही व्यक्त केली.यावेळी उपशिक्षणाधिकारी संजय क्षिरसागर म्हणाले की, मूलभूत विज्ञानात संशोधन होऊन नवीन संशोधकाची निर्मिती व्हावी या उद्देशातून हा मेळावा आयोजित केला जातो तर भविष्यामध्ये अशा प्रकारचे संशोधक येथून निर्माण झाले पाहिजे अशी शुभेच्छा सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी दिली. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून जीवन जगावे आणि सोबतच एक चांगला नागरिक बनावे अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली.

यावेळी वैशाली गावकरे, श्रुती रेड्डी, शिवानी कडवंजे आणि श्री स्वामी सर यांनी मेळाव्या प्रती आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक शिक्षण उपनिरीक्षक लक्ष्मण बालवाड यांनी केले सूत्रसंचालन आणि आभार शिवलिंग नागापुरे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. घनश्याम ताडेवार, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, प्रा. राम पाटील, आनंद खोपे, मुळे संगमेश्वर यांनी परिश्रम घेतले.

# युवा भिम सेनेची कामगार महिला कार्यकारणी तसेच जिल्हा कार्यकारणी जाहिर



लातूर : युवा भिम सेना (महाराष्ट्र राज्य) या सामाजिक संघटनेच्या महिला कामगार कार्यकारणीची निवड संस्थापक अध्यक्ष पंकजभाऊ काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी महिला जिल्हाअध्यक्षा उमाताई आदमाने यांच्या अध्यक्षतेखाली पंचतारांकित ग्रँड हॉटेल लातूर याठिकाणी पद वाटप व सत्कार समारंभ घेण्यात आला या वेळी रत्नमालाताई आत्माराम गोमसाळे यांना महिला कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष पद देण्यात आले.

तसेच ईनुबाई शिवाजी आदमाने यांना मराठवाडा कामगार अध्यक्ष, कु. तनुजा अंगद गायकवाड - विद्यार्थी महिला जिल्हाध्यक्ष, मायाताई दादासाहेब सोनवणे - शहराध्यक्ष महिला कामगार आघाडी, उषा दिपक सोनटक्के - शहराध्यक्षा विद्यार्थी महिला आघाडी,रेशमा अशोक दहिरे-महिला कामगार उपाध्यक्ष शहर, शामल बाबासाहेब दहिरे-शहर सचिव महिला कामगार आघाडी, वैशाली बाबु वोहाळ - शहर सह संघटक महिला कामगार आघाडी, सविता ज्ञानदेव जाधव - शहर उपाध्यक्ष महिला कामगार आघाडी, अनिता विवेक डावरे - शहर सल्लागार महिला आघाडी यांची नियुक्ती करण्यात आली.

तसेच युवकांमध्ये आजपर्यंत केलेल्या समाज कार्याची दखल घेऊन शेखर राजेंद्र कांबळे यांना युवा जिल्हाध्यक्ष लातूर, वैभव दयानंद कांबळे - जिल्हाउपाध्यक्ष लातूर, ॲड. वैभव अशोक साबळे-कायदे व सल्लागार, लखन आत्माराम गोमसाळे - कामगार शहराध्यक्ष लातूर, आनंद बाबासाहेब दहिरे - टोरिक्षा युनियन शहराध्यक्ष लातूर पदि पदनियुक्त करण्यात आले.

यावेळी युवा भिम सेनेचे संस्थापक उपाध्यक्ष महेबुबभाई सय्यद, प्रितम ओव्हाळ, प्रदेश प्रवक्ते- सुफि सय्यद शमशोद्दिन, सिध्दार्थ गवळी - जिल्हाउपाध्यक्ष विद्यार्थी आघाडी, समाधान वाघमारे, आत्माराम गोमसाळे, नागेश कोळेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या वेळी प्रदेश प्रवक्ते सुफि सय्यद यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी समाजातिल अन्याय व अत्याचार दूर करण्यासाठी सदैव कार्यरत रहावे अशे मार्गदर्शन केले.


# लातूर ग्रामीण संगांनियोचे नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे रुजू



लातूर : लातूर ग्रामीण संजय गांधी निराधार अनुदान योजना विभागाचे नूतन नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे यांनी आपल्या पदाचा पदभार नुकताच स्विकारला आहे.त्यांचे स्वागत होत आहे.वीस वर्षांपूर्वी महसूल विभागात लिपीक म्हणून सेवेत दाखल झालेल्या परमेश्वर कांबळे यांनी पुढे छत्रपती संभाजी नगर जिल्हाधिकारी कार्यालयात अव्वल कारकून म्हणून अनेक वर्षे सेवा बजावली आहे. त्यांना नायब तहसीलदार पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर लातूर ग्रामीण संजय गांधी निराधार अनुदान योजना विभागाचे नायब तहसीलदार पद बहाल करण्यात आले आहे. त्यांच्या सर्वच स्थरातून स्वागत होत आहे.

आपल्या पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी कामकाजाला आरंभ केला असून, निराधार योजनेच पात्र,गरजू लाभार्थींना न्याय देण्याचा आपला प्रयत्न राहील असे सांगून कोणीही लाभार्थींनी आपल्या अडचणीबाबत प्रत्यक्ष संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवात पंडित किरण भावठाणकर व हरीश कुलकर्णी यांची गायन सेवा संपन्न



लातूर : श्री उत्तरादिमठ लातूर व मध्व मंडळ,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री राघवेंद्र आराधना महोत्सव पंडित किरण भावठाणकर व श्री हरीश कुलकर्णी यांच्या सुरेल गायनाने संपन्न झाली यामध्ये सुरुवातीला पंडित किरण भावठाणकर यांनी राग दुर्गा मधील झपतालात सखी मोरी रूम झूम बंदीशी ने या कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर अनुरणीया थोकडा तुका आकाशाएवढाहा संत तुकाराम महाराजांचा अभंग सादर करून वातावरण तायार केले.

त्यानंतर श्री हरीश कुलकर्णी यांनी येग येग विठाबाई माझे पंढरीचे आई हे भक्ती गीत सादर केले. श्री निकेतना हे कन्नड भजन गाऊन वातावरण तयार केले. त्यानंतर देव बंदा नम्मा स्वामी बंदानुहे कन्नड भजन गाऊन श्रोत्यांची दाद मिळवली तदनंतर पंडित किरण भावठाणकर व हरीश कुलकर्णी यांनी जो भजे हरी को सदा सो ही परमपद पावेगा या भैरवी रागातील भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

त्यांना हार्मोनियमची साथ संगत श्री संतोष बिडकर यांनी तर तबल्याची साथ श्री रमाकांत स्वामी व श्री दिनेश पोखरकर यांनी केली.

# माजी प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांच्या उपस्थितीत पुस्तकांचे प्रकाशन व व्याख्यानाचे आयोजन

## नागरिकांना उपस्थित राहण्याचे नम्र आवाहन

लातूर : महाराष्ट्र अंनिस जिल्हा शाखा व प्रकाशन संयोजन समितीच्यावतीने, हॉटेल अंजनी सभागृह छ.शिवाजी महाराज चौक लातूर येथे, एक सप्टेबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता, थोर विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये, पुस्तके प्रकाशन व जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब पौळगुरुजी राहणार आहेत.

अहमदपूर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त साथी सुनिल खंडाळीकर लिखित, चिंतन एका कार्यकर्त्याचे हा लेखसंग्रह व त्यांच्याच तरंग अंतरीचे या काव्य संग्रहाचे प्रकाशन, यावेळी करण्यात येणार आहे.

तसेच, साहित्य व साहित्यिकांची लोकशाहीशी बांधिलकी या विषयावर, प्रसिध्द विचारवंत तथा विचारशलाकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांचे प्रमुख व्याख्यान होणार आहे. तर यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक प्रा. निशिकांत देशपांडे, प्रसिद्ध ग्रामीण कवी शंकर वाडेवाले, प्रसिद्ध कवी व लेखक शिवाजी मरगीळ, प्रसिद्ध विद्रोही कवी कॉ. अकुंश सिंदगीकर व महाराष्ट्र अंनिसचे जिल्हाकार्याध्यक्ष अनिल दरेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. आणि श्री दादासाहेब रामचंद्र पौळगुरुजी खंडाळीकर हे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

तेव्हा या प्रकाशन समारंभ व जाहीर व्याख्यानास नागरिक व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन प्रा. डॉ. सुशीलाताई पिंपळे- नारनवरे, रामकुमार रायवाडीकर, प्रा. डॉ. डी. टी. घटकार, उतरेश्वर बिराजदार, शिरीषकुमार शेरखाने, प्रा. डॉ. दशरथ भिसे, संजय लाडके, सुधीर भोसले, संजय व्यवहारे, सूरज पाटील, गणपतराव तेलंगे, बाळ होळीकर, सचिन औरंगे, श्याम वारियाणी, वलीसाहेब शेख, गोपाळतात्या चिकाटे, माया सोरटे, अमृत भोगे, अण्णाराव सुर्यवंशी, प्रा. भगवान अमलापुरे, वलीभाई शेख, प्रभाकर तिडके, बाबुराव श्रीमंगले, अन्सार तांबोळी, माजी सरपंच माधवराव गायकवाड, रोझा रायवाडीकर, अंगदराव कांबळे आदींनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर : राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राज्यातील गणेशोत्सव मंडळांसाठी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. याबाबत ३१ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

७ सप्टेंबर २०२४ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहे. यासाठी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे. राज्यातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या गणेशोत्सव मंडळाना अनुक्रमे ५ लाख रुपये, २ लाख ५० हजार रुपये आणि १ लाख रुपये पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

तसेच राज्य समितीकडे ३६ जिल्ह्यातील प्रत्येकी १ याप्रमाणे ३६ प्राप्त शिफारसीत गणेशोत्सव मंडळापैकी ३ विजेते गणेशोत्सव मंडळ वगळून उर्वरित ३३ गणेशोत्सव मंडळांचाही राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपये पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील गणेशोत्सव मंडळाची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येणार आहे. या स्पर्धेची माहिती आणि अर्ज करण्यासाठी http://pldeshpandekalaacademy.org या संकेतस्थळाला भेट द्यावी. या स्पर्धेसाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत आहे.

# गो.ला.क.वि.च्या कु.गुंजन व्यास ची विभागीय स्तरावरील अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यासाठी निवड



लातूर : राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रवी नगर, नागपूर. नेहरू विज्ञान केंद्र मुंबई, जिल्हा परिषद शिक्षण विभाग लातूर यांच्या विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यात येथील श्री गोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालयाच्या कु. गुंजन दीपक व्यास इ.१० वी, या विद्यार्थिनीने आर्टिफिशियल इंटेलिजन्स संभाव्यता व आव्हाने या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला.शाळेच्या विज्ञान विभाग प्रमुख सौ.माया माने यांनी तीला मार्गदर्शन केले होते.

या जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्याचे आयोजन महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान माननीय गुरुलिंग धाराशिवे यांनी भूषविले. कार्यक्रमासाठी मा.नागेशजी मापारी साहेब, (शिक्षणाधिकारी माध्यमिक) मा. संजय क्षीरसागर (उपशिक्षणाधिकारी माध्यमिक),मा. लक्ष्मण बालवाड (शिक्षण उपनिरीक्षक) जि.परिषद लातूर यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते कु.गुंजन व्यासला १०००/- , प्रमाणपत्र, शॉल व पुष्पहाराने सन्मानित करण्यात आले.

प्रसंगी श्री.म.बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, पर्यवेक्षक शिवशरण हावळे यांनीही आपला अमूल्य वेळ स्पर्धेसाठी दिला. परीक्षक म्हणून प्रा. आवाड,प्रा. गोरे, प्रा. पाटील मॅडम यांनी आपली भूमिका चोखपणे बजावली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.बालवाड साहेबांनी केले.

सूत्रसंचालन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक मा.शिवलिंग नागापुरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा.प्रा. संजय पवार यांनी मानले. विज्ञान मेळाव्यासाठी लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील दोन स्पर्धक व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांची उपस्थिती होती. कु. गुंजनच्या या यशाबद्दल शाळेच्या शालेय समिती अध्यक्ष मा. कुमुदिनीजी भार्गव,मु.अ. संगीता कासार ,निरीक्षिका अचला देशमुख, परीक्षा विभाग प्रमुख शास्त्री सुजाता, विज्ञान विभाग प्रमुख माया माने सर्व शिक्षक, कर्मचारी वृंद व विद्यार्थिनी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विभागीय स्तरासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# लातूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यात 'अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष' स्थापन!

लातूर : महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबतचा अधिनियम २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्रक जा.क्र. पोमसं/२४/३४/अंधश्रध्दा विधेकयक ५७८/२०१३ दि.१९/०८/२०२१ आन्वये प्रत्येक पोस्टेला जादुटोना प्रतिबंधक कक्ष स्थापण करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे. त्याअनुशंगाने मा. पोलीस अधिक्षक सोमय मुंडे यांचे आदेशावरून अपर पोलीस अधिक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली अंध्दश्रध्दा निर्मुलन आणि जादुटोना अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजाणीसाठी लातुर जिल्हयामध्ये पोस्टेनिहाय कक्ष स्थापण करण्यात आले आहेत.

व त्याचे नोडल ऑफीसर म्हणुन पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, लातूर संजीवन मिरकले यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तर पोलीस स्टेशन स्तरावर एक अधिकारी दोन पोलिस अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली असून जादूटोणाविरोधी कायदा अंतर्गत येणाऱ्या तक्रारी वर तात्काळ कार्यवाही करण्यात येणार आहेत.

# माझं लातूर परिवाराच्यावतीने जिल्हा रूग्णालयासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना घेराव





लातूर : लातूर जिल्हा रूग्णालय हस्तांतरण निधी वर्ग करून त्वरित भूमिपूजन करावे असे साकडे घालून माझं लातूर परिवारातील पत्रकारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना याबाबतचे दुसऱ्यांदा निवेदन दिले. परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषी महोत्सवात उपस्थित राहण्यासाठी ते लातूर विमानतळावर उतरले होते.

लातूर जिल्हा रूग्णालय उभारणीसाठी शासनाने जागा हस्तांतरण करण्यास मंजुरी दिलेली आहे. यासाठी लागणारा मोबदला रुपये ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास देण्याची तरतूद देखील केली आहे. मात्र अद्याप यासाठीचा निधी आरोग्य विभागाने कृषी विभागास वर्ग केलेला नाही. हा निधी त्वरीत वर्ग करून लातूरच्या प्रलंबित आणि मंजूर असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन करून लातूरकरांना उपकृत करावे अशी विनंती यावेळी पत्रकारांनी केली. हा निधी वर्ग करून ६० दिवसांच्या आत जिल्हा रूग्णालय हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे असा शासन आदेश (१९ जून २०२४) आहे. याची मुदत १९ ऑगस्ट २०२४ रोजी संपली आहे.

गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित प्रश्न शासनाने मार्गी लावला यासाठी महाराष्ट्र शासनाचे आभार देखील मानण्यात आले. जिल्हा रूग्णालय व्हावे यासाठी माझं लातूर परिवाराने निर्णायक लढा दिला आहे. ऐतिहासिक साखळी उपोषण, मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री यांना विनंती केली होती. राज्याचे प्रमुख आणि संवेदनशील, जाणकार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री म्हणून आपण हा प्रश्न त्वरित मार्गी लागेल यासाठी त्वरीत निर्देश द्यावेत, , अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळात सतीश तांदळे, अभय मिरजकर, नितीन बनसोडे, महेंद्र जोंधळे, हारुन मोमीन, श्रीराम जाधव, सचिन अंकुलगे, डॉ. सितम सोनवणे, उमेश कांबळे, रत्नाकर निलंगेकर, सुनिल कांबळे, वैभव बालकुंदे, ऋषी होळीकर, अमोल घायाळ, विजय कवाळे, निशांत भद्रेश्वर, असिफ पटेल या पत्रकार बांधवांचा समावेश होता.

# युवराज जाधव शासनाच्या ग्रंथमित्र पुरस्काराने सन्मानीत



मुंबई : महाराष्ट्र राज्य उच्च च तंत्र शिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालय,मुंबईच्या वतीने देण्यात येणारा छत्रपती संभाजी नगर विभागीय डॉ.एस.आर.रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता ग्रंथमित्र पुरस्कार २०२२-२०२३ लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे उपाध्यक्ष तथा शिवणी बु.च्या लोकमान्य सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष युवराज मोहनराव जाधव यांना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मंगळवार,दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी एस.एन.डी.टी.महिला मुक्त विद्यापीठात प्रदान करण्यात आला.२५ हजार रुपये,सन्मानचिन्ह,मानपत्र ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

महाराष्ट्रातील जनतेचे सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान लाभावे,ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा,ग्रंथालयाकडून जनतेला अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालयाकडून दरवर्षी सार्वजनिक ग्रंथालये,ग्रंथालय कर्मचारी,ग्रंथालय कार्यकर्ते यांना विविध पुरस्कार दिले जातात,त्यातील २०२२-२३ छत्रपती संभाजी नगर विभागीय डॉ.एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे उपाध्यक्ष युवराज जाधव यांना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मुंबईत प्रदान करण्यात आला.

यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधानसचिव विकासचंद्र रस्तोगी,उपसचिव प्रताप बा.लुबाळ,खा.कुमार केतकर,राज्य ग्रंथालय संचालनालयाचे संचालक अशोक गाडेकर,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार,मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले,सर्व विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक,सर्व जिल्ह्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी,लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे हावगीराव बेरकीळे,गुप्तलिंग स्वामी,अनिल पाटील,ग्रंथमित्र संतोष करमले,ग्रंथमित्र संजय सूर्यवंशी सुशील मेकले,साहेबराव गायकवाड,गायकवाड चिखलीकर तुकाराम जाधव, श्रीकांत जाधव, ज्ञानेश्वर जाधव,राहूल औटे,औदुंबर जाधव,मधुकर जाधव,व्यंकट औटी,सुदर्शन माने तसेच राज्यातील ग्रंथालय चळवळीतील पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलीस भरतीत निवड झालेल्या उमेदवारांना पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिले नियुक्तीचे आदेश

लातूर : याबाबत माहिती अशी की लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर एकूण ६४ पोलीस अमलदारांची भरती करिता दिनांक १९/०६/२०२४ पासून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनात अतिशय पारदर्शकपणे भरती प्रक्रिया राबविण्यात आली.

सदर भरती प्रक्रियेत विविध परीक्षा व चाचण्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराची मेरिट प्रमाणे लिस्ट लावून पोलीस भरती संदर्भातले मापदंड पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी व इतर कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्याने दिनांक २३/०८/२०२४ रोजी एकूण ३० उमेदवारांना पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पोलीस अंमलदार पदाचे नियुक्ती आदेश दिले.




पोलीस भरती सहभाग घेऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना काही दिवसातच लातूर जिल्हा पोलीस दलात पोलीस अमलदर म्हणून नियुक्तीचे आदेश मिळाल्याने त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण होते. तसेच लवकरात लवकर नियुक्ती आदेश मिळाल्याने समाधान व्यक्त करून पोलीस दलाचे व महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

निवड झालेल्या एकूण ६४ उमेदवार पैकी ३० उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी व इतर कागदपत्राची पडताळणी पूर्ण झाल्याने त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले असून उर्वरित ३४ उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी व कागदपत्रांची तपासणी होताच त्यांना पण लवकरात-लवकर नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत.

# स्वतः सोबत इतरांचा आदर करा -प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई



लातूर : आपल्याला निरोगी, सुदृढ, सक्षम आणि आनंदी जीवन जगायचे असेल तर स्वतः सोबत इतरांचा आदर केला पाहिजे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले. महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभागातर्फे समाजकार्य पंधरवडा अंतर्गत शिव्या मुक्त अभियान या कार्यक्रमांतर्गत इतरांचा आदर.... महिलांचा सन्मान या विषयावरील समारोप समारंभ महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाला यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारमंचावर प्रा. काशिनाथ पवार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. भाग्यश्री भुजबळ, आणि प्रा. प्रकाश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. पुढे बोलताना प्राचार्य प्रभारी डॉ. गवई म्हणाले की, आज आपण सर्वांनी व्यावसायिक समाजकार्याच्या अभ्यासाच्या माध्यमातून समुदाय शिव्यामुक्त झाल्याने समृद्ध आणि लोकशाही राष्ट्र निर्माण होईल. आपण एक उत्कृष्ट व्यावसायिक समाजकार्यकर्ता बनाल. महाराष्ट्रातील सर्व समाजकार्य महाविद्यालये आणि मास्वे संघटनेने समाजकार्य पंधरवड्याच्या माध्यमातून शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध १४ उपक्रमाची माहिती देऊन याद्वारे खऱ्या अर्थाने आपल्या देशात सौंदर्यपूर्ण वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे सांगून त्यांनी मासवे संघटनेचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. काशिनाथ पवार यांनी केले. तर आभार प्रा. भाग्यश्री भुजबळ यांनी मानले. या कार्यक्रमात अनिल मुंडे, माने आकांक्षा, अंजली गर्जे, काळे शिवानी, प्रशांत सुरवसे या विद्यार्थ्यांनी शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या उपक्रमाविषयी विविध क्षेत्रकार्य संस्था व समुदायात घेतलेल्या कार्यक्रमाचा आढावा आपल्या मनोगत आतून व्यक्त केला.

या कार्यक्रमाला समाजकार्य विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वात शेवटी सामूहिक राष्ट्रगीताने समाजकार्य पंधरवाडा या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दिनेश मौने, प्रा. नागेश जाधव, प्रा. दत्ता करंडे, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, संतोष येचेवाड, आनंद खोंपे यांनी परिश्रम घेतले.

# अधिकाऱ्यांनी जाण ठेवून नागरीकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य द्यावे-खा.ओमराजे निंबाळकर

भुम(प्रतिनिधी): भुम तालुक्यातील नागरीकांच्या प्रशासन संदर्भातील १५८ तक्रारी व अनेक निवेदने प्राप्त झाल्या. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी भुम येथील तहसिल कार्यालय येथे जनता दरबाराचे आयोजन करुन संबंधीत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जनतेचे सर्व प्रश्न तात्काळ मार्गी लावणेबाबत सुचना करण्यात आल्या.



भुम तालुक्यातून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय भुम व विविध शासकीय कार्यालयाकडील प्रलंबित प्रश्नाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, कार्यकारी अभियंता म.रा. वि.वि.आगार प्रमुख म. रा. प. म., विविध बँकेचे व्यवस्थापक यांना तात्काळ सुचना देवून सर्व प्रश्न १५ दिवसाचे आत मार्गी लावून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरुपात खासदार संपर्क कार्यालयाकडे सादर करणेबाबत सुचना ही केली. भुम येथील तहसिल कार्यालयात सोयाबिन पिकावरील येलो मोझॅक, आण्णासाहेब पाटील महामंडळ, अंतरजातीय विवाह अनुदान तसेच खरीप पिक कर्ज वाटप, राज्य परीवहन महामंडळ व अन्य शासकीय कार्यालयातील प्रलंबित कामाच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

या तक्रारीचे निवारण करत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खासदार संपर्क कार्यालयाकडे सादर करण्याच्या सुचना करण्यात आल्या. तसेच पुढील जनता दरबाराच्या वेळी याबाबतचा आढावा घेणार असल्याचे स्पष्ट केले.यावेळी भुम तालुक्यातील शिवसेना जिल्हाप्रमुख रणजित पाटील, तालुका प्रमुख श्रीनिवास जाधवर, समन्वयक दिलीप शाळु महाराज, युवा सेना जिल्हा प्रमुख डॉ. चेतन बोराडे, शहर प्रमुख प्रकाश आखरे, विधानसभा युवा सेना अधिकारी प्रल्हाद आडागळे, युवासेना चिटणीस माऊली शाळु, महिला आघाडी प्रमुख जिन्नत मॅडम सय्यद, महिला आघाडी तालुकाप्रमुख उमादेवी रणदिवे, युवासेना उपजिल्हाप्रमुख दिनेश मांगले, शिक्षक संघटनेचे कोहीनुर सय्यद, विहीन कदम, बाळासाहेब गुळवे आदीसह सर्व खात्याचे प्रमुख अधिकारी तसेच सर्व बँकेचे व्यवस्थापक व प्रशासनातील सर्व अधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थी सहाय्यक मंडळास डॉ.नागोराव कुंभार यांची २५ हजारांची देणगी



लातूर : थोर विचारवंत,माजी प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांनी लातूरच्या विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजार रुपयांची देणगी देवून गरीब होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य केले केल्याबद्दल त्यांचा मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

डॉ.नागोराव कुंभार यांनी त्रैमासिक विचारशलाकामधून लोकशाही, भारतीय संविधान,मानवी मूल्य जोपासण्याचे काम केले,तसेच शिक्षण क्षेत्रातही अनमोल कार्य केल्याची दखल घेवून सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्थेच्यावतीने समाजभूषण पुरस्कार देवून खा.शरद पवार यांच्या हस्ते नुकतेच सन्मानीत करण्यात आले होते.या सन्मानाबद्दल विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते शाल,पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.नागोराव कुंभार यांनी विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजार रुपयांची देणगी दिली.

या प्रसंगी मंडळाचे सचिव प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.कुसुमताई मोरे, कोषाध्यक्ष प्रा.बालाजी पळसकर, सहसचिव विक्रम कदम, संचालक प्रा.फ.म.शहाजिंदे, ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे,प्रा.सुधीर साळुंके आदि उपस्थित होते.

# पानगावच्या नागरीकांनी पुकारला कडकडीत बंद



**रस्ता चालू झाल्या शिवाय माघार नाहीच**

मागील आठ दिवसांपासून रखडलेला रस्ता व्हावा म्हणून खरोळा फाटा येथे साखळी उपोषण सुरु आहे. परंतु या भागाचे लोकप्रतिनिधी, शासन प्रशासनाला याचे काहीच वाटत नसल्याचे दिसत आहे. आता आठ दिवस बसलो आहोत, आणखी कितीही दिवस बसावे लागले तरीही जोपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही, तोपर्यंत आंदोलनातून माघे हटणार नाही. अशी भूमिका आंदोलनक संकेश भंडारेसह आंदोलकांनी घेतली आहे.

पानगाव : रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु करावे, या प्रमुख मागणीसाठी पानगाव ग्रामस्थांनी खरोळा फाट्यावर १५ ऑगस्टपासून बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात केली असून आंदोलनाचा आठवा दिवस आहे. रस्ता व्हावा म्हणून रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील ५५ शेतकऱ्यांनी मुद्रांकावर समंतीपत्र दिले आहे. अनेकांची रस्ता अडविणार नाहीत, अशी संम्मती दिली आहे. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून पानगावकरांनी कडकडीत बंद करून पानगाव ते आंदोलन स्थळापर्यंत रॅली काढून पाठिंबा दिला आहे.

उमरगा ते खामगाव जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. एन. एच ३६१ (एच) हा रेणापुर- खरोळा फाटा, घनसरगांव, मुरढव, पाथरवाडी, पानगावमार्गे पुढे परळीला गेला आहे. या महामार्गाला २०१८ मध्ये मंजुरी मिळाली होती. खरोळा फाटा ते पानगाव १४ कि.मी. हा रस्ता तब्बल सहा वर्षापासून रखडला होता. परंतु बागझरी कॉर्नर ते पन्नगेश्वर कारखान्यापर्यंतच्या (४ कि.मी) कामास प्रत्यक्षात सुरवात झाली आहे. उर्वरीत १० कि.मी.चे काम शिल्लक आहे. हा रस्ता पूर्ण व्हावा याकरिता पानगावसह परिसरातील गावानी वेगवेगळ्या प्रकारची आत्तापर्यंत अनेक अंदोलने केली आहेत. परंतु मार्ग निघु शकलेला नाही.

आता मात्र 'आर या पार' म्हणत पानगाव ग्रामस्थ गेल्या आठ दिवसांपासून खरोळा फाटा येथे आंदोलन सुरु केले आहे. या बेमुदत साखळी उपोषणास बसलेल्या ग्रामस्थांना पाठिंबा म्हणून पानगाव व्यापारी असोशिएशनच्या वतीने गुरुवार, दि. २२ ऑगस्ट रोजी पानगाव बंदची हाक देण्यात आली होती. या अवाहनाला पानगावकरांनी सहमती दर्शवून गावातील शाळा, सरकारी दवाखाना, बँका वगळता सर्व खाजगी मेडीकल्स, दवाखान्यासह सर्व व्यापारी प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेवून पानगाव ते अंदोलनस्थळापर्यंत वाहनांची रॅली काढीत लेखी पाठिंबा दिला.

यामध्ये गांवातील सर्व लहान मोठ्या व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला होता. या रस्त्यावरून नेहमी ये-जा करणाऱ्या वीस ते पंचवीस गावातील ग्रामस्थांनी आंदोलन स्थळी येवुन लेखी पाठिंबा दर्शविला आहे. रस्त्याकडेच्या ५५ शेतकऱ्यांनी १०० रुपयांच्या बॉण्ड पेपरवर रस्ता करण्या करिता संमतीपत्र दिलेले आहे. तर अनेक शेतकऱ्यांनी आंदोलन स्थळी येवुन समंती दर्शविली आहे. तर शिल्लक राहिलेले शेतकरीही संम्मती देणार असल्याने रस्त्याचा प्रश्न लवकरच सुटण्याची आशा निर्माण झाली आहे.




# द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस ...

(पान ३ वरून)

देशपातळीवर अनेक पुरस्कारांनी झाला आहे.मांजरा साखर परिवारातील तील मांजरा साखर, रेणा, जागृती, मारूती महाराज, विलास साखर, विलास २, विलासराव देशमुख शुगर हि सर्व साखर कारखाने, सहकारातील अनेक संस्था लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्याच मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीपणे पारदर्शकता ठेवून यशाचे शिखर गाठत वाटचाल करीत आहे आजचा हा सहकार साखर उद्योग गौरव पुरस्काराने लातूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**राज्यभरातून दिलीपराव देशमुख यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव**

राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांना साखर उद्योग डीएसटीए चा मानाचा पुरस्कार भेटल्याबद्दल साखर उद्योग तसेच राज्यातून लातूर, मुंबई, कोल्हापूर, सांगली सातारा सोलापूर बीड परभणी नांदेड येथील विविध साखर कारखान्याचे अध्यक्ष तसेच सहकारी संस्थेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांचेकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंट्र्स, बी-२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक - शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200